NEHRU
BAL PUSTAKALAYA

# सोनाची सफर


तारा तिवारी

अनुवाद
सविता जाजोदिया

चित्रकार
मिकी पटेल






नेहरू बाल पुस्तकालय

# सोनाची सफ़र

तारा तिवारी

अनुवाद
सविता जाजोदिया

चित्रकार
मिकी पटेल

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-3720-3
पहिली आवृत्ती : 1974 *(शके 1895)*
दुसरी आवृत्ती : 1988 *(शके 1911)*
तिसरी आवृत्ती : 1991 *(शके 1913)*
चौथी आवृत्ती : 1992 *(शके 1914)*
पाचवी आवृत्ती : 2002 *(शके 1923)*
सहावी आवृत्ती : 2003 *(शके 1924)*
मूळ © तारा तिवारी, 1974
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1974
Sona's Adventures *(Marathi)*

**रु. 14.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.




वाळवंटातून एक उंटीण सावकाश चालली होती .... बरोबर होता तिचा मुलगा – सोना. दिवस खूपच तापलेला होता. कडक उन्हात गरम पिवळी वाळू झळाळत होती. अचानक सोना थांबला. वाळूत पाय रोवून मख्ख उभा राहिला.


"माझ्याच्यानं अजिबात चालवत नाही," तो कुरकुरला, "मला अतिशय तहान लागली आहे. पाणी हवंय."

आईने त्याच्याकडे पाहिले. प्रेमळपणे ती म्हणाली, "बाळ, तुला तहान लागली आहे हे खरं आहे. पण आता फार चालायचं राहिलेलं नाही. थोडं पुढे गेलं की पाणी मिळेल. ते बघ तिकडे."

तिने आपली लांबलचक मान उंचावली. थोड्याच अंतरावर झाडांची एक रांग दिसत होती.

"ती झाडं पाहिलीस? वाळवंटात अशी झाडं जिथं असतात तिथं पाणी नक्कीच असतं. कदाचित एखादं खेडं देखील तिथं असेल. बरं ते जाऊ दे. तिथं किनई इतर प्राणीदेखील असतील. तुला त्यांच्याशी खेळायला मिळेल. चल बघू चटपट."







"वा, मग तर फारच छान!" सोना उद्गारला, आणि भराभर पावले टाकू लागला. थोड्याच वेळात ते त्या झाडांपाशी पोचले. आईने मान वर केली. आणि नाकपुड्या फुगवून वास घेतला.

"या बाजूला चल," डावीकडे वळत ती म्हणाली, "या बाजूला मला पाण्याचा वास येतोय."

दोघे चालू लागले. पुढे गेल्यावर त्यांना एक तळे दिसले. तळ्याच्या चारी बाजूला दाट झाडी होती. उंच उंच झाडे होती. पाणी स्वच्छ आणि थंडगार होते माना खाली करून दोघेही अगदी पोटभर पाणी प्याले. जवळच्या झाडावर एक कावळा बसला होता. तो हे सर्व पाहात होता.

सोनाचे व त्याच्या आईचे पाणी पिऊन झाले तेव्हा नवलाने तो म्हणाला, "अबब, किती पाणी पिता! आजवर मी कुणाही प्राण्याला इतकं पाणी पिताना पाहिलं नाही. खरंच." मान वेळावीत तो कावळा पुढे म्हणाला, "तुम्ही तर पाणी पिऊन सारं तळं कोरडं करून टाकाल."



"छे, छे, ते कसं शक्य आहे...." आई हसत हसत म्हणाली. "बाकी तुझं म्हणणं काही खोटं नाही. आम्ही उंट एकाच वेळी खूप सारं पाणी पितो."


"का म्हणून ?" कावळ्याने विचारले.

"आम्ही बहुधा वाळवंटात राहतो. तिथं पाणी फारसं मिळत नाही. पण आम्हाला त्याचं काही वाटत नाही. कारण आम्ही कित्येक दिवस पाण्यावाचून राहू शकतो. आमच्या पोटात पाणी साठवण्यासाठी एक वेगळी पिशवी असते. शिवाय कधी पाणी मिळालं नाही तर आमच्या शरीरातून आम्हाला आपोआप पाणी मिळतं. याच्या अगोदर आम्ही केव्हा पाणी प्यायलो होतो ठाऊक आहे?"


"केव्हा?" कावळ्याने उत्सुकतेने विचारले. त्याला हे अनोळखी प्राणी मोठे गमतीदार वाटत होते.

"पाच दिवसांपूर्वी" आईने उत्तर दिले.

"पाच दिवसांपूर्वी? कमालच आहे!" कावळा आश्चर्याने थक्क होऊन म्हणाला. आणि इतर प्राण्यांना ही विलक्षण गोष्ट सांगण्यासाठी तो उडून गेला.









सोनाने हे ऐकले तेव्हा त्याला मोठा अभिमान वाटला.

"आई, आपण सर्वांपेक्षा वेगळे आहोत. नाही का ग?" त्याने विचारले.

"आहोतच मुळी!" आईने उत्तर दिले.


झाडाची सावली पाहून दोघे खाली बसले. लवकरच आई डुलक्या घेऊ लागली.

"बाळ, तूही झोप." आई म्हणाली.

"ऊं हूं. मी जरा आजूबाजूला फिरून येतो," सोना म्हणाला आणि चालू लागला.

तोवर कावळ्याने उंटांची बातमी सर्वांना देऊन टाकलीच होती. मोठ्या प्राण्यांनी कावळ्याचे बोलणे ऐकले. पण तिकडे फारसे लक्ष दिले नाही. छोटे प्राणी मात्र लगेच या विचित्र प्राण्याला बघायला निघाले. उंटांना गुपचुप बघता यावे म्हणून ते सर्वजण खडकांच्या मागे, झाडीच्या आड दडून बसले.






त्यांनी सोनाला इकडे तिकडे हिंडताना पाहिले. बडबड्या सशाला मात्र राहवले नाही. तो टुणकन् उडी मारून झाडी बाहेर आला. मागच्या दोन पायांवर बसला व टक लावून सोनाकडे बघू लागला. अचानक तो खोखो करून हसू लागला.

"कोण आहे रे तू ? आणि असा वेड्यासारखा हसतोस काय ?" सोनाने रागावून विचारले.

"तू – हा, हा, हा !" सशाला हसू आवरेना. "तू इतका मजेशीर दिसतोस. कावळ्यानं सांगितलं होतं की तू मोठा अजब प्राणी आहेस. पण तू काही इतका अजब दिसत नाहीस. तू तर कुरूप अणि वेडगळ फक्त दिसतोस. काय त्या तुझ्या लांब तंगड्या, पाठीवरचं ते मलं मोठं कुबड आणि ती मान.... हा, हा, हा !"









इतर प्राणी देखील खिदळू लागले.—बोकड, डुकर, हरीण, कोल्हा वगैरे सारेच हसू लागले. त्यांनी सोनाला गराडा घातला व ते त्याची चेष्टा करू लागले.

"काय रे तुझं नाव काय?" डुकराने विचारले. "आणि तुझ्या पाठीवर ते मलंमोठं पोक कसलं आलंय? चला रे, आपण याला कुबड्या म्हणू— कुबड्या—हा, हा, हा!"

"छे,छे," बोकड म्हणाला. "आपण याला सपाट पायांचा म्हणू या. त्याच्या त्या ओंगळवाण्या लांबलचक तंगड्या आणि विचित्र सपाट तळवे तर बघा."

बोकडाने आपले सडपातळ, सुंदर पाय दाखवण्यासाठी उगाचच वर खाली उड्या मारल्या.

"त्या लांबोड्या घाणेरड्या मानेचं काय? हा, हा, हा!"

"आणि तुम्ही त्याचं ते शेपूट पाहिलं का?" सोनाच्या लहानशा आखुड शेपटाकडे बोट दाखवीत कोल्हा ओरडला. "माझं शेपूट बघा. किती छान आहे." आपले झुबकेदार शेपूट हलवीत कोल्हा मोठ्या घमेंडीत बोलला.

"ए, उगाच काय रे त्या बिचाऱ्याच्या मागे लागता." प्रेमळ हरीण म्हणाले. "माझं शेपूट देखील त्याच्या सारखंच लहान आहे."


बिचारा सोना! काय बोलावे ते त्याला समजेना. त्याला अतिशय वाईट वाटले. रागही आला. तो तसाच धावत आईकडे गेला. त्याला सारखे त्या सर्वांचे खिदळणे ऐकू येत होते. फक्त हरणाने त्याची टर उडवली नव्हती.

आईला बघताच सोना रडू लागला. "काय झालं बाळ?" आईने मायेने विचारले. सोनाच्या गालांवरून अश्रू वाहू लागले. " आई, मला हे प्राणी मुळीच आवडले नाहीत. किती वाईट आहेत ते.



त्यांनी माझी चेष्टा केली. कुबड्या, सपाट पायांचा, अशी काय काय नावं त्यांनी मला ठेवली. मी नाही कधी त्यांच्याशी खेळणार," सोना म्हणाला. घडलेला सारा प्रकार त्याने आईला सांगितला.

"चल बघू. असा रडू नकोस." आई म्हणाली, "ते सर्व वेडे आहेत ना म्हणून तुला हसले. त्यांना काय ठाऊक आपल्या पाठीवर कुबड का असतं ते. त्यांना जर समजलं तर त्यांनाही वाटेल की आपल्या पाठीवर कुबड असावं. फार काय आपल्या-सारखे सपाट तळवे असावे असंही त्यांना वाटेल."



"पण ते किती ओंगळ दिसतात. ते आपल्यालाच तेवढे का म्हणून आहेत?"

आई म्हणाली, "तुला आठवतं, थोड्या वेळापूर्वी मी काय म्हटलं होतं ते. आपण पाणी कसं साठवतो ते मी तुला सांगत होते. आपलं हे जे पोक आहे ना त्यात आपण चरबी ठेवतो. आपल्याला जेव्हा बरेच दिवस खायला मिळत नाही तेव्हा ही चरबी अन्न म्हणून आपल्या उपयोगी पडते."

"ती कशी?" सोनाने विचारले.

आईने उत्तर दिले, "आपण जे खातो त्यातल्या काही भागाची चरबी बनते. ती चरबी हे जे पोक आहे तिथं जमा होते. वाळवंटात कित्येक दिवस आपल्याला खायला मिळत नाही. कधी फारच थोडंसं खायला मिळतं. या चरबीमुळं आपल्याला अशक्तपणा येत नाही. आता आपण आलो आहोत ती वाळवंटातील ओलाव्याची जागा आहे. अशा ठिकाणी अन्न व पाणी मिळतं. पण अशा जागी पोहोचेपर्यंत चालत राहायची ताकत या चरबीमुळं आपल्याला मिळत राहते."








"आणि आपल्या या लांब ढांगा व घाणेरडे सपाट तळवे —त्यांचं काय ?" सोनाने विचारले."

"बाळ, त्यांना घाणेरडं म्हणू नकोस," आई म्हणाली. "ते फार फार उपयोगी आहेत. आपल्या या लांब पायांमुळं आपण भराभर चालू शकतो. आणि आपले तळवे जर असे गोलाकार व सपाट नसते तर ते वाळूत रुतले असते. अडकून बसले असते. इतर प्राण्यांना जर हे कळलं ना तर त्यांना आपला हेवा वाटेल!"



"आणि आपल्या या लांब मानेचा काय उपयोग आहे ग आई?" सोनाने विचारले. आता त्याला मनातून आनंद झालेला होता.

"आपले पाय लांब आहेत ना म्हणून आपली मान देखील लांब असायलाच हवी." आईने उत्तर दिले. नाहीतर जमिनीवरच्या एखाद्या वस्तूपर्यंत आपलं तोंड कसं पोचणार? आपल्या लांबलचक मानांमुळं आपल्याला उंच झाडांची पानं खाता येतात. तसंच दूर दूरवर आपल्याला बघता येतं. आपलं पोक, आपले लांब पाय, सपाट तळवे, आणि लांब माना सारं काही अतिशय उपयोगाचं आहे. तुला त्यांचा अभिमान वाटायला हवा."

सोना भलताच खूष झाला. आईने त्याच्यासाठी ताजा हिरवागार पाला तोडून ठेवला होता. तो सारा त्याने फस्त केला. मग तो झोपी गेला.





दुसऱ्या दिवशी पुन्हा तो फिरायला निघाला. ससा, कोल्हा, डुक्कर, आणि बोकड सर्वजण खेळत होते. सोनाने त्यांच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहिले नाही. ताठ मानेने तो आपला चालत राहिला.

"चला, आपण त्याचा पाठलाग करू या." कोल्हा म्हणाला.


सर्वजण सोनाची टर उडवीत हसत खिदळत त्याच्या पाठोपाठ निघाले. सोनाने त्यांच्याकडे लक्षच दिले नाही. तो आपला चालत राहिला.

जवळच्या तळ्याच्या काठी अंजिराचे एक झाड होते. त्याला चांगली पिकलेली मोठाली फळे लागलेली होती. पाहूनच तोंडाला पाणी सुटत होते. सोनाने मान उंचावली. काही अंजीर तोडले. त्यांची चव पाहिली. चव छानच होती. सोनाने अंजीर खायचा सपाटा चालवला.


बाकीचे सर्वजण त्याच्याकडे आ वासून बघत राहिले. अंजीर सर्वांनाच हवे होते. पण फांद्या खूप उंचावर होत्या.

"तुम्हाला काय वाटतं? आपण जर त्याला विनंती केली तर तो आपल्याला थोडेसे अंजीर देईल?" हरणाने विचारले.

"छट, मी नाही त्याच्यापाशी मागणार." बोकड घमेंडीने म्हणाला. "त्यापेक्षा मी स्वतःच अंजीर आणतो. मला कुठंही चढता येतं. ठाऊक आहे ना?"







बोकड मागच्या पायांवर उभा राहिला. पुढचे पाय त्याने झाडावर टेकवले. मान ताणली आणि फांदीपर्यंत पोचायचा तो प्रयत्न करू लागला. पण फांदी उंच होती. बोकडाने मान आणखी वर केली. आणखी वर केली. त्याचा तोल सुटला. धपदिशी तो पाण्यात पडला.

"वाचवा, वाचवा," तो ओरडला.



त्याचे सर्व मित्र धावत तळ्याच्या काठी आले. पण कुणालाच त्याला मदत करता येईना. ते सर्वजण खूपच लहान होते. बोकडाला पाण्यातून कसे काढणार? अखेर त्यांनी सोनापाशी धाव घेतली.

"मेहरबानी करून त्याला वाचव," सर्वांनी एकदमच म्हटले. "तू इतका मोठा आहेस. तुला सहज जमेल."

सोना लगेच पाण्यात शिरला.

"चल झटपट माझ्या पाठीवर बैस." सोना म्हणाला आणि खाली वाकला. बोकड त्याच्या पाठीवर चढला. त्याला सोनाविषयी कृतज्ञता वाटू लागली. सोना त्याला नीट सांभाळून काठावर घेऊन आला.



"मी तुझा अतिशय आभारी आहे. तू फारच दयाळू आहेस. मी उगाच तुझी टर उडवली. मला आता त्याचं फार वाईट वाटतं. मला क्षमा कर. आजपासून आपण दोघं मित्र होऊ या;" बोकड म्हणाला.

"चल आमच्याशी खेळायला ये," ससा म्हणाला. "आणि त्या बोकडा सारखं किनई मलाही पाठीवर बसवून फिरवून आण ना."

"चल ये;" सोना आनंदाने म्हणाला.

त्या दिवसापासून सर्वांची गट्टी जमली.



रु. 14.00 ISBN 81-237-3720-3

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

